**L. A. BILL No. XXIX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION ACT, 1997.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९९७ चा महा. ३८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ सप्टेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ;

२०२१ चा महा. अध्या. २.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यत येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ सप्टेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १०९२—१ (८०५——१२-२०२१)

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २६ ची सुधारणा.

१९९७ चा महा. ३८.

**२.** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २६ मधील,—

(एक) पोट-कलम (३) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता, असे अर्ज १५ सप्टेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी करण्यात येतील.";

(दोन) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता विहित कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते १० ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठविण्यात येतील.".

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील, पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता, संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, १५ सप्टेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी मंडळाकडे अर्ज करील.".

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२१ चा महा. अध्या. २.

**४.** (१) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ (१९९७ चा महा. ३८) मध्ये, पदविकास्तरीय तंत्र शिक्षणाशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना करण्यासाठी तरतूद केली आहे. उक्त अधिनियमाची कलमे २६, २७ व ३५ यांमध्ये नवीन संस्था, नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय, जादा तुकड्या सुरू करण्यासाठी व संस्था बंद करण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता अर्ज करण्याची आणि छाननीनंतर अर्ज शासनाकडे पाठविण्याची कालमर्यादा विहित केली आहे. नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, त्याने ज्या वर्षापासून परवानगी मागितलेली आहे त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी मंडळाकडे विहित नमुन्यात अर्ज करील अशी तरतूद उक्त कलम २६ च्या पोट-कलम (३) मध्ये केली आहे. उपरोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठविण्यात येतील अशी तरतूद उक्त कलम २६ च्या पोट-कलम (४) मध्ये केली आहे. नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय आणि जादा तुकड्या सुरू करण्याच्या परवानगीच्या कार्यपद्धतीबाबत तरतूद कलम २७ च्या पोट-कलम (५) मध्ये केली आहे. संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन, आधीच्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी मंडळाकडे अर्ज करील, अशी तरतूद कलम ३५ च्या पोट-कलम (२) मध्ये केली आहे. तथापि, कोविड-१९ वैश्विक साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे, उक्त अधिनियमामध्ये विहित केलेल्या कालमर्यादेचे अनुपालन करणे शक्य नव्हते.

२. संपूर्ण भारत, कोविड-१९ वैश्विक साथरोगाला तोंड देत आहे आणि त्याचा शैक्षणिक व सामाजिक-आर्थिक क्षेत्रावर मोठ्याप्रमाणात प्रतिकूल परिणाम झाला आहे. या वैश्विक साथरोगामुळे तरुण पिढीसाठी रोजगारविषयक समस्या देखील निर्माण झालेल्या आहेत. अशी गंभीर परिस्थिती विचारात घेता आणि तरूणांना भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रस्तावित केल्याप्रमाणे उदयोन्मुख क्षेत्रांतील कौशल्य शिक्षण देऊन त्यांच्यासाठी शैक्षणिक व रोजगारविषयक संधी वाढविण्याकरिता, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन संस्था, नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय, जादा तुकड्या सुरू करण्यासाठी , संस्था बंद करण्यासाठी परवानगी घेण्याकरिता अर्ज करण्यासाठी व अर्ज छाननी झाल्यानंतर शासनास पाठविण्यासाठी नवीन वेळापत्रक विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटले. या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ याची कलमे २६ व ३५ मध्ये यथोचित सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक २ सप्टेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. २), प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २५ नोव्हेंबर २०२१.

**उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२१ चे वि.स.वि.क्र. २९–महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ यातील उतारे)

### (सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८)

**१.** ते **२५.** * * * *

**२६.** (१) व (२) * * * * परवानगी संबंधीची कार्यपद्धती.

(३) नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी मंडळाच्या सदस्य सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) व (६) * * * *

**२७.** ते **३४.** * * * *

**३५.** (१) * * * * संस्था बंद करणे.

(२) संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन आधीच्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवशी संस्था बंद करण्यासंबधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या स्वरूपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा संस्थांकडून वेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून मंडळाकडे अर्ज करील.

(३) ते (७) * * * *

**३६.** ते **५४** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.]**

**[ महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७**
**यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई